**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत-अमेरिका व्यापार करारात देशातल्या कृषी आणि खतं क्षेत्रांची काळजी घेतल्याचं सरकारचं संसदेत निवेदन

- सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेत महापौर आणि उपमहापौर बिनविरोध

- सोन्या-चांदीच्या दरात तेजी कायम, सोनं ५ हजार आणि चांदी साडे १८ हजारांनी महाग

**आणि**

- पुणे–मुंबई द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडी कायम, एसटीकडून फेऱ्या रद्द

**<><><><><>**

भारत - अमेरिका व्यापार करारात भारतातल्या कृषी आणि खतं क्षेत्रांची काळजी घेतली आहे. या करारामुळे छोट्या आणि मध्यम उद्योगांना कुशल कामगारांना नव्या संधी निर्माण होतील, असं निवेदन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी संसदेत बोलताना सांगितलं.

- **- होल्ड बाईट गोयल - - -**

या करारावर दोन्ही देशांनी एक वर्ष चर्चा केली, त्यानंतर त्याला अंतिम स्वरूप दिलं गेलं. या करारात भारताला आपल्या महत्त्वाच्या क्षेत्रांचं हित साधण्यात यश आल्याचं गोयल यांनी सांगितलं. या व्यापार कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी आवश्यक प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण केली जाईल, जेणेकरून त्याची अंमलबजावणी करता येईल, असं ते म्हणाले. अमेरिकेने भारताच्या निर्यातीवरचं आयात शुल्क अठरा टक्क्यांपर्यंत कमी केल्यामुळे अमेरिकन बाजारात भारतीय मालाचा प्रवेश सुलभ होईल. उत्पादन साखळी बळकट करण्यासाठी, रोजगाराच्या संधींचा विस्तार करण्यासाठी, आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी हा करार एक उत्प्रेरक म्हणून काम करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिवंगत अजित पवार यांचं नाव देण्याच्या मागणीचा विचार करत असल्याचं मुख्यमंत्री

देवेंद्र फडनवीस म्हणाले. ते आज हरिद्वार इथं बातमीदारांशी बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी काल यासंदर्भात मागणी केली होती.

महायुतीची समन्वय समिती एकत्र बसून यावर निर्णय घेईल, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

सरकार अत्यल्प भूधारक आणि गरजू शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी प्रयत्नशील आहे. मात्र, ज्यांच्याकडे स्वतःची गाडी, घोडा आहे किंवा जे आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, अशा समृद्ध शेतकऱ्यांनी कर्जमाफीचा लाभ घेऊ नये, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. ते आज लातूर इथं बातमीदारांशी बोलत होते. शेतकरी कर्जमुक्त व्हावा यासाठी प्रवीण परदेशी समिती काम करत असून, त्यांचा अहवाल लवकरच येईल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेच्या महापौरपदी भाजपाचे धीरज सूर्यवंशी आणि उपमहापौर पदी राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन मगदूम यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. आज अर्ज भरण्याची मुदत संपली त्यावेळी दोन्ही पदांसाठी एक-एकच अर्ज दाखल झाला होता. 10 फेब्रुवारीला निवडीची अधिकृत घोषणा केली जाणार आहे.

मालेगावच्या महापौरपदासाठी ३, तर उपमहापौरपदासाठी ५ उमेदवार रिंगणात आहेत. जालना महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर निवडीसाठी आज अर्ज वितरणाच्या पहिल्या दिवशी महापौरपदासाठी दहा, तर उपमहापौरपदासाठी आठ नामनिर्देशपत्र वितरित केल्याची माहिती महापालिका प्रशासनानं दिली. येत्या नऊ तारखेला ही निवडणूक होणार आहे.

<><><><>

नाशिकच्या महापौर आणि उपमहापौरपदासाठी वरिष्ठ पातळीवर ठरलेले उमेदवार बदलण्यात आल्याचा आरोप करत नाशिक शहर भाजपा अध्यक्ष सुनील केदार यांनी राजीनामा दिला होता. मात्र नंतर नगरसेवकांची बैठक बोलावून ज्येष्ठ नेते गिरीश महाजन यांनी समजूत काढल्यावर केदार यांनी राजीनामा मागे घेतला.

<><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विलिनीकरणाशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संबंध नाही, दिवंगत अजित पवार यांची जयंत पाटील यांच्याबरोबर याविषयी चर्चा झाली होती, असं ते म्हणाले. सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपदाची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि अपघाताच्या चौकशीसंदर्भात सरकारनं योग्य निर्णय घ्यावा, असंही पवार यांनी सांगितलं.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष संघटना मजबूत करण्यावर लक्ष केंद्रीत करत असून, राजकीय जुळवाजुळव करण्यावर नाही, असंही त्यांनी विलिनीकरणाच्या मुद्द्यावर बोलताना सांगितलं.

अमेरिका आर्थिकदृष्ट्या शक्तिशाली देश असून, जर अमेरिकेतील कृषी उत्पादनं भारतात आली तर त्याचा भारतीय शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम होऊ शकतो, अशीही चिंता पवार यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षाची घोषणा लवकरच केली जाईल, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी दिली आहे. मुंबईत ते वार्ताहरांशी बोलत होते. सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून पक्षाला मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही ते म्हणाले.

विलिनीकरणाच्या मुद्द्यावर भाजपाशी चर्चा आवश्यक असल्याचा पुनरुच्चार तटकरे यांनी आज केला.

**<><><><><>**

सोनं आणि चांदीच्या दरात सुरू असलेली तेजी आजही कायम राहिली. दिवसअखेर चांदी किलोमागे साडे १८ हजार रुपयांनी महाग झाली. त्यामुळं मुंबईच्या सराफा बाजारात एक किलो चांदीचा दर २ लाख ९१ हजारांच्या जवळपास गेला होता. सोनंही आज तोळ्यामागे ५ हजार रुपयांनी महाग झालं. त्यामुळं १ तोळा २४ कॅरेट सोनं १ लाख ६१ हजार रुपये आणि १ तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ५७ हजार रुपये मोजावे लागत होते.

माहिती तंत्रज्ञान कंपन्यांच्या समभागात जोरदार घसरण झाल्यानं शेअर बाजारातली तेजी आज झाकोळली गेली. त्यामुळं दिवसअखेर सेन्सेक्स ७९ अंकांनी वधारुन ८३ हजार

८१८ अंकांवर बंद झाला. निफ्टी ४८ अंकांची वाढ नोंदवून २५ हजार ७७६ अंकांवर स्थिरावला.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची तीन दिवसांची द्वैमासिक बैठक आजपासून सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा परवा सकाळी १० वाजता बैठकीतले निर्णय जाहीर करतील.

<><><><><>

पुणे–मुंबई द्रुतगती महामार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपेलिन गॅसची वाहतूक करणारा टँकर उलटल्यामुळे महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. काल संध्याकाळपासून वाहतूक कोंडी कायम असल्यानं या आता 30 किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

या वाहतूक कोंडीचा मोठा फटका एसटीच्या बस सेवांवर झाला आहे. या परिस्थितीमुळे राज्याच्या विविध विभागांमधल्या एकूण 139 बस फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. पुणे–मुंबई द्रुतगती महामार्गावरच एसटीच्या एकूण 163 गाड्या वाहतूक कोंडीत अडकल्या. पुण्यावरून मुंबईला जाणाऱ्या गाड्या रद्द केल्या आहेत. द्रुतगती महामार्गावरची वाहतूक सुरळीत होताच बस सेवा टप्प्याटप्प्यानं पूर्ववत केली जाईल, असं एसटीनं कळवलं आहे.

<><><><><>

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या नेवासे तालुक्यातल्या सौंदाणे इथल्या नागरिकांनी गावात सकाळी दहा वाजता राष्ट्रगीत वाजवण्याची प्रथा सुरू केली आहे, अशी माहिती सरपंच शरद अरगडे यांनी दिली.

**- - - होल्ड - सरपंच बाइट - -**

या गावात अपशब्द वापरणाऱ्याला ५०० रुपये दंड केला जातो. ग्रामपंचायतीकडून पुनर्विवाह करणाऱ्या महिलेला ११ हजार रुपये दिले जातात. सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा यासाठी भोंगा वाजवून ६ ते ८ त्यांना अभ्यास करायला सांगितलं जातं.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांविरुद्धच्या कारवाईत १०९ नायजेरियन नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. या नागरिकांच्या झडतीदरम्यान, २ किलो कोकेन जप्त करण्यात आलं. या नागरिकांकडे प्रवास किंवा निवासाची कोणतीही वैध कागदपत्रं सापडलेली नाहीत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><><>

कांदा दरात झालेल्या घसरणीचा निषेध करत शेतकऱ्यांनी आज येवला कृषी उत्पन्न बाजार समितीतला लिलाव बंद पाडला. तसंच पुणे - इंदूर महामार्गावर रास्तारोको आंदोलन केलं. मागण्यांचं निवेदन तहसीलदारांनी स्वीकारल्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेतलं.

<><><><><>

क्रिकेटमध्ये १९ वर्षाखालच्या युवकांच्या विश्वचषक स्पर्धेत आज  हरारे इंथं सुरु असलेल्या उपांत्या सामन्यात अफगाणिस्तानं भारतापुढं ३११ धावांचं आव्हान ठेवलं आहे. अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली आहे. ५० षटकात अफगाणिस्ताननं ४ बाद ३१० धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २७ षटकांत २ बाद २०८ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

मनमाड-धुळे- इंदूर रेल्वे मार्गासाठी  धुळे जिल्ह्यात आणखी ११८ हेक्टर जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया राबवण्याची तयारी प्रशासनाने पूर्ण केली आहे. तसंच बाधितांना नियम आणि अटीनुसार मोबदला देण्याची तयारीही झाल्याचं प्रशासनानं सांगितलं.

<><><><><>

उद्योगपती अनिल अंबानी यांच्या मालकीच्या कंपन्यांशी संबंधित फसवणुकीच्या प्रकरणांची चौकशी वेगाने करावी, त्याकरता विशेष तपास पथकाची स्थापना करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज सीबीआय आणि ईडीला दिले. अनिल अंबानी यांच्या अनेक कंपन्यांमध्ये सार्वजनिक निधीचा गैरवापर, आर्थिक विवरणांमध्ये फेरफार केल्याचा आरोप करणाऱ्या जनहित याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

//<><><><><>//